## महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील :-**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील खालील संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येतात :-

| अ. क्र. | विभाग | संवर्ग | पदाचे नांव | वेतनबँड व ग्रेड वेतन | उच्च पदावर पदोन्नतीच्या संधी | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | (१) जलसंपदा विभाग<br>(२) सार्वजनिक बांधकाम विभाग<br>(३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | स्थापत्य अभियांत्रिकी | **सहायक कार्यकारी अभियंता स्थापत्य, गट-अ** | रुपये १५६००-३९१००, + ग्रेड पे रुपये ५४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार अभियांत्रिकी सेवेतील उच्च कार्यकारी व प्रशासकीय पदावर | महाराष्ट्रात कोठेही |
| | | | **सहायक अभियंता स्थापत्य, गट-अ** | रुपये १५६००-३९१००, + ग्रेड पे रुपये ५४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| | | | **सहायक अभियंता स्थापत्य, गट-ब** | रुपये ९३००-३४८००, + ग्रेड पे रुपये ४४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| | (४) मृद व जलसंधारण विभाग | स्थापत्य अभियांत्रिकी | **उप विभागीय जलसंधारण अधिकारी स्थापत्य, गट-अ** | रुपये १५६००-३९१००, + ग्रेड पे रुपये ५४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| | | | **जलसंधारण अधिकारी स्थापत्य, गट-ब** | रुपये ९३००-३४८००, + ग्रेड पे रुपये ४४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| २ | (१) जलसंपदा विभाग<br>(२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | यांत्रिकी अभियांत्रिकी | **सहायक अभियंता यांत्रिकी, गट-ब** | रुपये ९३००-३४८००, + ग्रेड पे रुपये ४४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| ३ | सार्वजनिक बांधकाम विभाग | विद्युत अभियांत्रिकी | **सहायक अभियंता विद्युत, गट-ब** | रुपये ९३००-३४८००, + ग्रेड पे रुपये ४४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| ४ | जलसंपदा विभाग, | विद्युत व यांत्रिकी, अभियांत्रिकी | **सहायक अभियंता विद्युत व यांत्रिकी, गट-ब** | रुपये ९३००-३४८००, + ग्रेड पे रुपये ४४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |

**१.२** वेतनश्रेणीमध्ये शासनाच्या धोरणानुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**१.३** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात/अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतील.

**२. परीक्षेचे टप्पे :-**

**२.१** प्रस्तुत परीक्षा एकूण तीन टप्प्यात घेण्यात येते :- (१)संयुक्त पूर्व परीक्षा (२) प्रत्येक संवर्गाची स्वतंत्र मुख्य परीक्षा (३) प्रत्येक संवर्गाची स्वतंत्र मुलाखत

**२.२** स्थापत्य अभियांत्रिकी, यांत्रिकी अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी तसेच विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी संवर्गातील पदांवरील भरतीकरीता एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येते.

**२.३** शासनाकडून विहित कालावधीत प्राप्त होणा-या मागणीपत्राच्या आधारे उपलब्ध संवर्गाची पदे जाहिरातीमध्ये नमूद करण्यात येतील व त्याच्या आधारे पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

२.४ संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन, अर्ज करणा-या उमेदवारांकडून ते यांपैकी कोणत्या संवर्गासाठी बसू इच्छितात याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल.

२.५ ज्या संवर्गाकरीता शासनाकडून मागणीपत्र प्राप्त झाले आहे; त्या संवर्गाची पदे जाहिरातीमध्ये नमूद करण्यात येतील व त्या संवर्गाकरीताच पूर्व परीक्षेसाठी अर्ज करताना उमेदवाराकडून विकल्प घेण्यात येईल.

२.६ संबंधित संवर्गासाठी उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधीत संवर्गाच्या भरतीकरीता अर्ज समजण्यात येईल/येतील.

२.७ संयुक्त पूर्व परीक्षेस अर्ज करताना दिलेला विकल्प तसेच, भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे, संबंधित पदाच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेच्या आधारे प्रत्येक संवर्गाकरीता स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

२.८ संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित संवर्गाकरीता घेण्यात येणा-या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांची स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

२.९ संबंधित संवर्गाच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमाच्या आधारे उमेदवारांची मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

२.१० मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. संबंधित संवर्गाच्या उपलब्ध पदांच्या आधारे पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते.

२.११ पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जात नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जात नाहीत.

२.१२ जाहिरातीतील तरतुदीनुसार विहित अटींची पूर्तता करणा-या व मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ कागदपत्रे सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते.

२.१३ संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना दिलेला/ले विकल्प व माहिती अंतिम समजण्यात येईल व त्याच्या आधारेच पुढील भरतीप्रक्रिया होईल.

२.१४ संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना दिलेला/ले विकल्प व अर्जामध्ये नमूद माहिती यामध्ये बदल करण्याबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करता येणार नाही.

**३. अर्हता :-**

**३.१ महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा, गट-अ व गट-ब**

**३.१.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने हया पदवीशी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता.

**३.१.२** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ नुसार खालील अर्हता हया पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-

(१) बी.ई (Civil and Water Management)

(२) बी.ई (Civil and Environmental)

(३) बी.ई (Structural)

(४) बी.ई (Construction Engineering / Technology)

**३.२ महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा, गट-ब**

मान्यताप्राप्त विद्यापीठाची यंत्र अभियांत्रिकीमधील पदवी.

**३.३ महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा, गट-ब**

**३.३.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने या पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**३.३.२** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ नुसार खालील अर्हता या पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-

(१) बी.ई (Electrical and Power)

(२) बी.ई (Electronics and Power)

(३) बी.ई (Power System)

(४) बी.ई (Electrical and Electronics )

**३.४ महाराष्ट्र विद्युत/यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा, गट-ब**

मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी किंवा विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकीमधील पदवी



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

**३.५** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**३.६** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**३.७** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज/माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

**३.८** मृद व जलसंधारण विभागांतर्गत भरण्यात येणा-या पदांकरीता मृद व जलसंधारण विभागाद्वारे विहित केलेले सेवाप्रवेश नियम/सेवाशर्ती भविष्यात लागू राहतील. तसेच अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना रिक्त होणा-या पदांवर टप्याटप्याने पदस्थापनेचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

**३.९** शैक्षणिक अर्हतेसंदर्भातील सविस्तर माहिती जाहिरात/अधिसूचनेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल व ती अंतिम समजण्यात येईल.

**४. शुल्क (फी) :-**

**४.१** प्रस्तुत भरतींकरीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | परीक्षा | शुल्क रुपये | |
|---|---|---|---|
| | | **अमागास** | **मागासवर्ग** |
| १ | संयुक्त पूर्व परीक्षा | ३७४ | २७४ |
| २ | प्रत्येक संवर्गाकरीता मुख्य परीक्षा | ५२४ | ३२४ |

**४.२** वि.जा.(अ),भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड), वि.मा.प्र.,इ.मा.व. तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रीमी लेअर)मोडणाऱ्या उमेदवारांनी त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**४.३** क्रीमी लेअर संदर्भातील उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**४.४** दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च,१९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून,१९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रत्यावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**५. संयुक्त पूर्व परीक्षा : -**

**५.१ परीक्षा योजना :-**

(१) **प्रश्नपत्रिका :** एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| प्रश्नपत्रिका क्र. | विषय (संकेतांक २०) | प्रश्न संख्या | गुण | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पेपर क्र.१ | मराठी | १० | १० | बारावी | मराठी | दीड तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | १० | १० | पदवी | इंग्रजी | | |
| | सामान्य अध्ययन (General Studies) | २० | २० | पदवी | मराठी व इंग्रजी | | |
| | अभियांत्रिकी अभियोग्यता चाचणी (Engineering Aptitude Test) | ६० | ६० | पदवी | इंग्रजी | | |
| | **एकूण** | **१००** | **१००** | | | | |

**५.२ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | घटक |
|---|---|
| १. | **मराठी : (१० प्रश्न/१० गुण)**<br>सर्व सामान्य शब्दसमूह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ व उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे . |
| २. | **इंग्रजी : (१० प्रश्न/१० गुण)**<br>Common Vocabulary, Sentence structure, Grammar, Use of Idioms & phrases and their meaning and comprehension of passage. |



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

| | |
|---|---|
| ३. | **सामान्य अध्ययन :- (२० प्रश्न/२० गुण)** |
| | **३.१ भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास (१८५७ ते १९९०)** |
| | **३.२ भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा भूगोल** |
| | **३.३ भारतीय अर्थव्यवस्था**<br>(१) भारतीय आयात – निर्यात<br>(२) राष्ट्रीय विकासात सरकारी, सहकारी, ग्रामीण बँकांची भूमिका<br>(३) शासकीय अर्थव्यवस्था - अर्थसंकल्प, लेखा, लेखापरीक्षण, इत्यादी.<br>(४) पंचवार्षिक योजना<br>(५) किंमती वाढण्याची कारणे व उपाय. |
| | **३.४ भारतीय राज्यव्यवस्था** |
| | **३.५ जागतिक तसेच भारतातील चालू घडामोडी** :- राजकीय, औद्योगिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, भौगोलिक, खगोलशास्त्रीय, सांस्कृतिक, वैज्ञानिक, इत्यादी . |
| | **३.६ पर्यावरण** :- मानवी विकास व पर्यावरण, पर्यावरण-पूरक विकास, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संधारण विशेषत: वनसंधारण, विविध प्रकारची प्रदूषणे व पर्यावरणीय आपत्ती, पर्यावरण संवर्धनात कार्यरत असलेल्या राज्य / राष्ट्र/ जागतिक पातळीवरील संघटना / संस्था. |
| ४. | **अभियांत्रिकी अभियोग्यता चाचणी (Engineering Aptitude Test):-(६०प्रश्न/६०गुण)** |
| | **4.1 Applied Mechanics –** |
| | (a) ***Matrices*** **–** Types of Matrices (Symmetric, Skew-symmetric, Hermitian, Skew Hermitian, Unitary, Orthogal aMatrices), properties of Matrices, Rank of a Matrix using Echelon forms, reduction to normal form, PAQ in normal form, system of homogeneous and non-homogeneous equations. Linear dependent and independent vectors. |
| | (b) ***Partial Differentiation*** **-** Partial Differentiation; Partial derivatives of first and higher order. Total differentials, differentiation of composite and implicit functions. Euler's theorem on homogeneous functions with two and three independent variables. Deductions from Euler's Theorem. |
| | (c) Applications of Partial Differentiation, Expansion of Functions, Maxima and Minima of function of two independent variables, Jacobian, Taylor's Theorem and Taylor's series, Machlaurin's series. |
| | (d) Linear Differential Equations with Constant Coefficients and Variable Coefficients of Higher Order – Linear Differential Equation with constant coefficients – complementary function, particular integrals of differential equation, Cauchy's homogeneous linear differential equation and Legendre's differential equation, Method of variation of parameters. |
| | (e) Differentiation under Integral sign, Numerical Integration - Differentiation under Integral sign with constant limits of integration,<br>Numerical Integration by (a) Trapezoidal (b) Simpson's 1/3 (c) Simpson's 3/8 rule. |
| | (f) Double Integration –Change the order of integration, Evaluation of double integrals by changing the order of integration and changing to polar form. |
| | (g) Triple Integration and Application of Multiple Integrals – Application of double integrals to compute Area, Mass, Volume. Application of triple integral to compute volume. |
| | **4.2 Engineering Mechanics -** |
| | (a) System of Coplanar Forces – Resultant of concurrent forces, parallel forces & Non concurrent Non parallel system of forces. Moment of force about any point, Couples, Varignon's theorem. Distributed forces in plane. Centroid and Centre of Gravity, Moment of Inertia & its theorem. |
| | (b) Condition of equilibrium for concurrent forces, Parallel forces and Non concurrent Non parallel general system of forces & couples. Types of supports, loads, beams. Analysis of trusses. |
| | (c) Laws of friction, Cone of friction, Equilibrium of bodies on inclined plane. Application of problems involving wedges, ladders, screw friction. |
| | (d) Kinematics of particle :- Velocity and acceleration in terms of rectangular coordinate system, Rectilinear motion. Motion along plane curved path. Tangential and Normal components of acceleration. Motion Curves (a-t, v-t, s-t curves). Projectile motion. Relative motion. Newton's second law, work energy principle, D'Alembert's principles, equation of dynamic equilibrium. Moment of Energy principles : Linear momentum, principle of conservation of momentum, Impact of solid bodies, direct and oblique impact, impact of solid bodies, semi elastic impact and plastic impact. |
| | **4.3 Elements of Civil Engineering** |
| | (a) ***Materials and Construction –*** |



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

| | |
|---|---|
| | (1) Use of basic materials cement, bricks, stone, natural and artificial sand, Reinforcing Steel- Mild, Tor and High Tensile Steel.<br>Concrete types – PCC, RCC, Pre-stressed and Precast. Introduction to smart materials. Recycling of materials. |
| | (2) Substructure – Function of foundations, (Only concepts of settlement and Bearing capacity of soils). Types of shallow foundations, (only concept of friction and bearing pile). |
| | (3) Superstructure – Types of loads :- DL and LL, wind loads, earthquake considerations. Types of construction – Load bearing, framed, composite. Fundamental requirements of masonary. |
| | (4) Introduction to automation in construction :- Concept, need, examples related to different civil engineering projects. |
| | (b) **Uses of maps and field surveys -** |
| | (1) Various types of maps and their uses. Principles of surveys. Modern survey method using levels, Theodolite, EDM, lasers, total stations and GPS. Introduction to digital mapping. Measuring areas from maps using digital planimeter. |
| | (2) Conducting simple and differential leveling for seeking out various benchmarks, determining the elevation of different points and preparation of contour maps. Introduction to GIS Software and other surveying soft-wares with respect to their capabilities and application areas. |
| | **4.4 Elements of Mechanical Engineering** |
| | (1) Thermodynamics- Thermodynamic work, p-dV work in various process, p-V representation of various thermodynamic processes and cycles. Ideal gas equation, properties of pure substance, Statements of Ist and IInd law of thermodynamics and their applications in mechanical engineering. Carnot cycle for Heat engine, refrigerator and heat pump. |
| | (2) Heat transfer – Statement and explanation of Fourier's Law of heat conduction, Newton's law of cooling, Stefan Boltzmann's law. Conducting and insulation materials and their properties. Selection of heat sink and heat source. |
| | (3) Power plants – Thermal, Hydro-electric, nuclear and solar wind hybrid power plants |
| | (4) Machine elements : Power transmission shafts, axles, keys, bush and ball bearings, Flywheel and Governors. |
| | (5) Power Transmission Devices – Types of belts and belt drives, Chain drives, type of gears, Types of couplings, friction clutch (cone and single plate), brakes (types and application only). Application of these devices. |
| | (6) Mechanism : (Descriptive treatment only) Slider crank mechanism, Four bar chain mechanism, List of various inversions of four bar chain mechanism, Geneva mechanism, Ratchet and Paul mechanism. |
| | (7) Materials use in Engineering and their Application Metals – Ferrous and Non-ferrous, Non metallic materials, Material selection criteria, Design consideration, Steps in Design. |
| | (8) Introduction to Manufacturing processes and Their Applications – Casting, Sheet metal forming, Sheet-metal cutting, Forging Fabrication, Metal joining processes. |
| | (9) Machine Tools (Basic elements, Working principle and types of operations) Lathe Machine – Centre Lathe Drilling Machine – Study of pillar drilling machine. Introduction to NC and CNC machine, grinding machine, Power saw, Milling Machine. |
| | **4.5 Elements of Electrical Engineering** |
| | (1) D.C. circuits : Kirchhoff's laws, ideal and practical voltage and current source, Mesh and nodal analysis (super node and super mesh excluded), Source transformation, Star-delta transformation, Superposition theorem, Thevein's theorem, Norton's theorem, Maximum power transfer theorem. |
| | (2) A.C. Circuits : Generation of alternating voltage and current, RMS and average value, form factor, crest factor, AC through resistance, inductance and capacitance, R-L, R-C, and R-L-C series and parallel circuits, phasor diagrams, power and power factor, series and parallel resonance, Q-factor and bandwidth |
| | (3) Three phase circuits :<br>Three phase voltage and current generation, star and delta connections (balanced load only), relationship between phase and line currents and voltages, Phasor diagrams, Basic principle of wattmeter, measurement of power by two wattmeter method. |
| | (4) Single phase transformer : Construction, working principle, Emf equation, ideal and practical transformer, transformer on no load and on load, phasor diagrams, equivalent circuit, O.C. and S.C. test, Efficiency. |



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

**५.३ परीक्षा केंद्र :-**

**५.३.१** संयुक्त पूर्व परीक्षा खालील ठिकाणी घेण्यात येईल :-

| केंद्र | केंद्राचा संकेतांक | केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | १५ | नागपूर | ३२ |
| मुंबई | ३० | पुणे | ३८ |

**५.३.२** उपरोक्त परीक्षा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**५.३.३** उपरोक्त परीक्षा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**५.३.४** विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**५.३.५** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**५.३.६** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

५.३.७ वरीलप्रमाणे केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेलया पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**५.४ पूर्व परीक्षेचा निकाल :**

**५.४.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**५.४.२** भरावयाच्या प्रत्येक संवर्गाकरीता स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

**५.४.३** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज करताना उमेदवारांकडून घेतलेल्या विकल्पाच्या आधारे तसेच प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे संबंधित संवर्गाकरीता (स्थापत्य, यांत्रिकी, विद्युत, विद्युत/यात्रिकी) भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे ८ पट उमेदवार संबंधित पदाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची स्वतंत्र सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुस-या टप्प्यात प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी १० पट उमेदवार उपलब्ध होतील, अशा रीतीने सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या राखीव प्रवर्गासाठीच्या पदावरच निवडीसाठी पात्र असतील.

**५.४.४** केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

**५.४.५** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी संयुक्त पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**५.४.६** अशा रितीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर तसेच आयोगाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.४.७** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

**५.४.८** संयुक्त पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६. मुख्य परीक्षा :-**

**६.१** प्रत्येक संवर्गाकरीता विहित करण्यात आलेल्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

**६.२ परीक्षेस प्रवेश :-**

**६.२.१** संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या मर्यादेनुसार पात्र ठरणा-या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.२.२** मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**६.२.३** संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारास प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे अर्ज सादर करुन विहित परीक्षा शुल्क भरावे लागेल.

**६.२.४** प्रस्तुत पदाच्या संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व शैक्षणिक अर्हता, मुख्य परीक्षेकरिता आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**६.३ परीक्षा योजना :**

**६.३.१ महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा गट-अ व गट-ब**

**६.३.१.१ मुख्य परीक्षेचे टप्पे - दोन - लेखी परीक्षा व मुलाखत**

**६.३.१.२ एकूण गुण :-** ४५० (१) लेखी परीक्षा - ४०० गुण (२) मुलाखत - ५० गुण

**६.३.१.३ प्रश्नपत्रिकांची संख्या :-** दोन. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| विषय | संकेतांक | माध्यम | दर्जा | प्रश्नसंख्या व गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|
| स्थापत्य अभियांत्रिकी पेपर १ | ०१८ | इंग्रजी | बी.ई. (सिव्हील) | १००/२०० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| स्थापत्य अभियांत्रिकी पेपर २ | ०१९ | इंग्रजी | बी.ई. (सिव्हील) | १००/२०० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**६.३.१.४ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे :-

**1. Civil Engineering, Paper - I**

| Sr. No. | Topics |
|---|---|
| 1. | **Building Construction & Materials**: Properties of wet and hardened concrete, tests on concrete, factors affecting strength of concrete, water-cement ratio, aggregate-cement ratio, mix design, additives, design of form work, types of formwork. Stones, bricks, cements, lime, mortar, timber, plastic, concrete, steel, paints and varnishes. Principles of building planning and design, integrated approach, building byelaws, building services such as vertical transportation, water supply sanitation, thermal ventilation, lighting, acoustics, fire protection, electrical fittings. Foundations, stones, brick and block masonry, steel and reinforced cement concrete structures, floors, doors and windows, roofs, finishing works, water proofing. |
| 2. | **Strength of materials**: Stresses, strains, principal stresses, bending moments, shear forces and torsion theory, bending theory of beam, deflection of beam, theories of buckling of columns. |
| 3. | **Theory of structures:** Analysis of beams, frames and trusses, slope deflection method, moment distribution method. |
| 4 | **Structural analysis**: Analysis of arches and suspension cables, influence lines, stiffness and flexibility matrix methods. |
| 5 | **Steel structures**: Design of bolted and welded connections, columns, footings, trusses, steel beams, plate girders. |
| 6 | **Design of reinforced concrete structures** (Working stress and limit state): Design of slab, beams, columns, footing. retaining walls, tanks, building frames, staircases. |
| 7 | **Pre-stressed Concrete**: Principles of pre-stressing, materials used and their properties, permissible stresses as per I.S. codes, systems of pre-stressing, losses in pre-stress, design of pre-tensioned and post-tensioned beams-simply supported, rectangular and T- beams, cable profile, end block design, bridge girder. |
| 8 | **Construction Planning and Management:** Elements of scientific management, elements of material management, safety engineering, network analysis, construction equipment, site layout, quality control.0 |
| 9 | Computer-aided analysis and design of structures, application of computer programming to structures. |



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

| | |
|---|---|
| | numerical methods such as-<br>i. Finding area by Simpson's rule, trapezoidal rule;<br>ii. Finding root of an equation by a) Newton-Raphson techniques<br>iii. b) Bisection method<br>iv. Solution of simultaneous equations by a) Gauss elimination method, b) Gauss-Jordan method, c) Iteration method. |

**2. Civil Engineering, Paper –II**

| Sr. No. | Topics |
|---|---|
| 1 | **Surveying:** Classification of surveys, measurement of distances-direct and indirect methods, optical and electronic devices, prismatic compass, local attraction; plane table surveying, levelling, calculations of volumes, contours, theodolite, theodolite traversing, omitted measurements, trigonometric levelling, tacheometry, curves, photogrammetry, geodetic surveying, hydrographic surveying. |
| 2 | **Estimating, Costing and Valuation:** Specification, estimation, costing, tenders and contracts, rate analysis, valuation |
